## निशाणी क्र. ७८ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुद्ध झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून त्यांना उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व निशाणी क्रमांक ८० ला असलेले म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा हा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून कब्जा मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तूत प्रतिवादी क्र. ३ यांना वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक वाटते. अशा स्वरुपाच्या दाव्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत वाद मुद्दयांची सुनावणी ही गुणावगुणावर होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. जरी याकामी प्रतिवादी यांच्या कडून विलंब व चूक झाली असेल तरी देखील सदर प्रकरणाचा निकाला गुणावगुणावर होण्यासाठी त्यांना एक शेवटची संधी देणे न्यायोचित वाटते.

४. प्रतिवादीतर्फे वादीचा क्रमांक १ चा उलटतपास नाहीचा आदेश दिनांक ०३/०३/२०२० रोजी व वादी साक्षीदाराचा उलटतपास नाहीचा आदेश दिनांक ०८/०३/२०२२ रोजी झाला आहे. प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज दिनांक १२/०७/२०२२ रोजी

दिला आहे. वादी क्रमांक १ चा उलटतपास नाही हा आदेश झाल्यापासून जवळपास दोन वर्ष चार महिने ९ दिवसांनी व वादी साक्षीदाराचा उलटतपास नाही हा आदेश झाल्यापासून ४ महिने ४ दिवसांनी हा अर्ज देण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीकडून या कामी बराच विलंब झालेला आहे असे दिसून येते. या विलंबाची नुकसान भरपाई वादींना होण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादीने खर्चाची रक्कम देण्याबाबत आदेश पारित करणे योग्य होईल असे वाटते. परिणामी, सदरचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

**आदेश**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. पुढील तारखेपर्यंत प्रस्तुत प्रतिवादीने रुपये २,०००/– (रु. दोन हजार फक्त ) खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी रुपये १०००/– (रु. एक हजार फक्त) वादींना दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. वरील प्रमाणे पुर्तता झाल्यानंतर प्रस्तुत प्रतिवादी विरुद्ध झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो व प्रस्तुत प्रतिवादी यांना वादी व वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

स्थळ : कोरेगाव
दिनांक : ११/१०/२०२२

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.